**जिल्हा परिषद, कोल्हापूर**
**सामान्य प्रशासन विभाग,**
नविन प्रशासकिय इमारत, पहिला मजला,
दालन क्र. १०७, नागाळा पार्क, कोल्हापूर-४१६००३
फोन नं.०२३१-२६५५४१६ e-mail - dyceogenkop@gmail.com

जा.क्र. क्र.कोजिप/साप्रवि/कावि -०५/१७ /२०२५ दि.२७/०१/२०२५

वाचले :- १) महा.शा.सा.प्र.वि.कडील शा.नि.अकंपा-१०९५/प्र.क्र३४-अ/आठ दि.११/०९/१९९६
२) महा.शा.सा.प्र.वि.कडील शा.नि.अकंपा-१००४/प्र.क्र.५१/२००४/आठ दि.२२/०८/२००५
३) महा.शा.सा.प्र.वि.कडील शा.नि.अकंपा/१२१७/प्र.क्र.१०२/आठ दि.२१/०९/२०१७
४) महा.शा.सा.प्र.वि.कडील शा.नि.अकंपा/१२२१/प्र.क्र.१८६/का-८ दि.२६/०८/२०२१
५) या कार्यालयाकडील मंजुर टिपणी दि.२७/०१/२०२५

## आदेश

संदर्भ क्र.१ चे शासन निर्णयानुसार जिल्हा परिषद, कोल्हापूर कडील गट क व गट ड मधील सेवेत असताना दिवंगत झालेल्या कर्मचाऱ्यांच्या कुटुंबातील अज्ञान वारसदाराचे बाबतीत एकाने सज्ञान म्हणजे १८ वर्षाचा झालेवर एक वर्षाच्या आत अनुकंपा योजनेखाली अर्ज करावा असे विहित केले आहे. तसेच संदर्भ क्रमांक २ चे शासन निर्णयानुसार सेवेत असताना दिवंगत झालेल्या कर्मचाऱ्यांचे कुटुंबियांनाच अनुकंपा नियुक्ती अनुज्ञेय आहे. त्यासाठी कर्मचारी दिवंगत झालेल्या दिनांकापासून एक वर्षाच्या आत अर्ज करणे आवश्यक आहे. तसेच अनुकंपा प्रतिक्षासुची प्रसिध्द करताना ज्या उमेदवारांचे परिपुर्ण अर्ज प्राप्त झाले आहेत त्यांचेच नाव प्रतिक्षासुचीमध्ये समाविष्ठ करणे बाबत संदर्भ क्र.४ चे शासन परिपत्रक निर्गमित झालेले आहे.

सद्यस्थितीत सन २०२३ चे अनुकंपा प्रतीक्षासुचीमधील नियुक्ती दयावयाचे एकुण ३१ उमेदवार तसेच दि.०१ जानेवारी २०२४ ते दि.३१ डिसेंबर २०२४ अखेर एकुण ३५ उमेदवारांचे प्रस्ताव प्राप्त झाले असुन एकुण ६६ अर्जाची तात्पुरती जेष्ठता यादी या सोबत जोडली आहे. त्यावर काही दुरुस्ती / हरकती असलेस त्या बाबत लेखी स्वरुपात दि. 3 /2 /२०२५ पर्यंत कळविणेत याव्यात. मुदतीनंतर आलेल्या अर्जाचा विचार करणेत येणार नाही. याची नोंद घ्यावी. सदरची यादी सा.प्र.वि.चे नोटीस बोर्ड व जिल्हा परिषदेच्या संकेतस्थळावर याद्वारे प्रसिध्द करणेत आली आहे.

(कार्तिकेयन एस.,भा.प्र.से)
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद कोल्हापूर**